# ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**दिनेश परदेशी**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

११ एप्रिल २०२६ रोजी ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर छत्रपती संभाजीनगर येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रकाश सोनवणे व संस्थेच्या सचिव श्रीमती संगीता खिल्लारे व तुकाराम सोनवणे हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री संदीप सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती. प्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रकाश सोनवणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी जातीभेदाच्या उतरंडीवर प्रहार करत, अस्पृश्यांसाठी पाण्याच्या टाक्या खुले केले आणि माणुसकीच्या नात्याने हक्क मिळवून दिले. जोतिबांनी सावित्रीबाई फुले यांच्यासह १८४८ मध्ये

**ज्ञान संदीर्ं शक्षण संस्था संचेलत तुकाराम प्राथेमके वद्यालय व तुकाराम सानिवर्णा हायस्कूल यर्थील विद्यार्थ्यांची शिस्त बघण्यासारखी आहे. विद्यार्थ्यांना वळण चांगले लागावे, त्यांच्यावर संस्कार चांगले व्हावेत यासाठी स्वत: प्रकाश सोनवणे हे लक्ष ठेवून असतात. प्रशंन्सा करण्यासाठी किंवा एखाद्याचे मनोबल वाढविण्यासाठी टाळीचा नाद केला जातो. तो देखील एका सुरात व लयबद्ध हे विशेष.**

मुलींची पहिली शाळा काढली, तसेच बहुजन व अस्पृश्य समाजातील मुला-मुलींसाठी शाळा सुरू केल्या. ज्योतिबा फुले यांनी केवळ सुधारणा मांडल्या नाहीत, तर त्या स्वतःच्या आयुष्यात आचरणात आणून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला. त्यांच्या या क्रांतीकारी कार्यामुळेच त्यांना १८८८ मध्ये 'महात्मा' पदवी बहाल करण्यात आली. यावर विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट करत प्रतिसाद दिला. याप्रसंगी शिक्षकांची व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# महात्मा ज्योतिबा फुले योजना चालते परंतु त्यांचे विचार चालत नाही -लक्ष्मण भुतकर

## भारतीय दलित पँथरच्या वतीने क्रांतिवीर महात्मा ज्योतिराव फुले जयंती साजरी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारतीय दलित पँथरच्या वतीने क्रांतिवीर महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती ११ एप्रिल २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सकाळी साडेनऊ वाजता फुलेनगर आंबेडकर नगर फुले मैदान येथील महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यास पँथर नेते लक्ष्मण दादा भुतकर व प्रकाश सोनवणे, धर्मपाल दांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महात्मा फुले यांच्या जीवनावर पँथर नेते लक्ष्मण भुतकर, प्रकाश सोनवणे यांनी विचार मांडले सर्व समाज बांधवांनी क्रांतिवीर महात्मा ज्योतिराव फुले यांचे विचार आचरणात आणा तसेच नेते मंडळी कार्यकर्ते व जनतेला महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने योजना चालते परंतु त्यांना महात्मा फुले यांनी दिलेल्या शिकवणुकीवर चालणे तसेच अभिवादन करणे चालत नाही. त्यांच्या नावाने समाजात कार्य करणे चालत नाही अशी मानसिकता सध्या बनत चालली आहे ती पुढील भविष्यासाठी योग्य नाही असे लक्ष्मण दादा भुतकर यांनी सांगितले.

यावेळी ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे सर म्हणाले की. शासनाने मराठी शाळा टिकल्या पाहिजे व मराठी शाळेतून विद्यार्थी घडले पाहिजे यासाठी विशिष्ट योजना राबवल्या पाहिजेत शैक्षणिक अडीअडचणी सोडवण्यातही शैक्षणिक संस्थांना मदतीचा हात पुढे केला पाहिजे जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना सुलभ व चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळेल असे ज्ञान संदीप शिक्षण संस्था संस्थापक अध्यक्ष प्रकाश सोनवणे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

याप्रसंगी ज्या ठिकाणी कचरा टाकला जात होता त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने सुंदर रांगोळी काढून स्वच्छता केली व परिसर सुशोभित केला तसेच मनपा कर्मचाऱ्यांनी स्वच्छता राखा सुखी राहा झाडे लावा निरोगी रहा असा संदेश फलक ही तेथे लावला या कॅम्पला भेट देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन सिद्धार्थ बोर्ड यांनी केले व आभार मानले यावेळी लक्ष्मण भुतकर, प्रकाश सोनवणे, धम्मपाल दांडगे ,दशरथ कांबळे, राधाकिसन पटेकर , संजय सरोदे , मधुकर आराख, एड. सिद्धार्थ गवई, गौतम पगारे समाधान कस्तुरे ,धोंडीराम सरोदे, उत्तम डोंगरे, जगदेव जाधव, धर्मा गवळी , पार्वतीबाई घोरपडे, कलावतीबाई गवळी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199